**सुधारित ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम- लोकसहभागाची संकल्पना व कार्यक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना-जलस्वराज्य प्रकल्पासाठी सुधारित सूचना**

**महाराष्ट्र शासन**
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्र.ग्रापापु १००३/प्र.क्र.१६६/पापु.०७
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२ दिनांक - २२ ऑगस्ट,२००३.**

वाचा : -१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु १००१/प्र.क्र.१९०/ पापु.०७, दिनांक ३ सप्टेंबर,२००१.
२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु-१००२/प्रक्र-५३२/ पापु-०७, दिनांक २३.३.२००२.

**प्रस्तावना-**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र शासनाचे सुधारित धोरण शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु १०९९/प्र.क्र.३२८/ पापु.०७ दिनांक २७.७.२००० अन्वये संपूर्ण राज्यामध्ये लागू करण्यात आल्यानंतर या सुधारित धोरणातील लोकसहभागाचे तत्व स्पष्ट करुन त्याअनुषंगाने या धोरणाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी संदर्भिय दि.३.९.२००१ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यामध्ये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाची अंमलबजावणी करीत असताना गेल्या दिड वर्षात प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये आलेल्या अडचणी, मागणी आधारित लोकसहभागातून पाणी पुरवठयाचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी ग्रामस्थांकडून आलेल्या सूचना व पूर्वीच्या अंमलबजावणी यंत्रणा व नव्या धोरणानुसार ज्यांची भूमिका व जबाबदारी आता मार्गदर्शक सहाय्यकारी यंत्रणा अशा स्वरुपाची आहे अशा जिल्हा परिषदा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा या शासकीय अथवा शासन नियंत्रित यंत्रणांकडून प्राप्त माहितीच्या आधारे वरील संदर्भात नमूद शासन आदेशातील काही सूचना व मार्गदर्शक तत्वांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. राज्यात नवीन मागणी आधारित लोकसहभागाच्या तत्वावर सुरु असलेल्या सर्व कार्यक्रमांसाठी या सूचनांची दुरुस्ती आवश्यक आहे. त्यापैकी जागतिक बँकेच्या सहाय्याने राज्यात जलस्वराज्य प्रकल्प राबविण्यासाठी जागतिक बँकेने केलेल्या आणखी काही सूचना विचारात घेऊन संदर्भिय **दि.३.९.२००१** च्या शासन निर्णयामधील मार्गदर्शक सूचनांमध्ये काही दुरुस्त्या करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय-**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन राज्यामध्ये जागतिक बँक सहाय्यीत **"जलस्वराज्य"** प्रकल्प राबविण्यासाठी संदर्भिय **दि.३.९.२००१** च्या शासन निर्णयात पुढीलप्रमाणे दुरुस्ती करण्यास शासन मंजूरी देत आहे :-

| अ.क्र | शासन निर्णय पा.पु.व स्व.वि. क्र.ग्रापापु १००१/प्र.क्र.१९०/पापु.०७ दिनांक ३.९.२००१ च्या परिच्छेद क्रमांक १ मधील उप परिच्छेदामध्ये अस्तित्वात असलेली तरतूद | या उप परिच्छेदात करण्यात आलेली दुरुस्ती |
|---|---|---|
| १ | (५)(क) योजनेच्या बांधकामाच्या टप्प्यानुसार जिल्हा परिषदेने नियुक्त केलेल्या अभियंत्याच्या प्रतिस्वाक्षरीनुसार देयके अदा करणे. | (५) (क) अशा प्रतिस्वाक्षरीची आवश्यकता नसून सुविधांच्या/योजनेच्या कामाच्या टप्प्यानुसार कंत्राटदारास देयके अदा करण्याचे संपूर्ण अधिकार ग्रामसभेस अथवा ग्रामसभेने विहीत अटीच्या अधीन राहून अधिकार दिल्यानुसार ग्राम पंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस असतील. आवश्यकतेनुसार संनियंत्रण व तपासणी करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेतील जलस्वराज्य प्रकल्पासाठी गठीत केलेल्या संबंधित यंत्रणेला असतील. |
| २ | (१२) प्रशासकीय मान्यतेसाठी व तांत्रिक मान्यतेसाठी व प्राप्त झालेल्या प्रस्तावावर संबंधित सक्षम प्राधिका-यांनी असे प्रस्ताव प्राप्त झाल्याचे तारखेपासून कमाल ६० दिवसात निर्णय घ्यावा. | (१२) योजनेच्या प्रस्तावास ग्रामसभा प्रशासकीय मान्यता देईल आणि ग्रामसभेने निवडलेली संस्था उदा.महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा किंवा जिल्हा परिषदेत जलस्वराज्य प्रकल्पासाठी **जिल्हा सुविधा चमूने (DFT)** तयार केलेल्या पॅनेलवरील विहीत अर्हता धारण करणा-या सार्वजनिक अथवा खाजगी तांत्रिक सल्लागार /अभियंत्यांकडून ग्राम पंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने / ग्रामसभेने मान्य केलेल्या सुविधा /योजनेची प्राक्कलने, आराखडे इत्यादीच्या तांत्रिक बाबींचे प्रमाणीकरण (Technical Feasibility) प्राप्त करुन घ्यावे. या मान्यता व प्रमाणीकरणाच्या प्रती जलस्वराज्य प्रकल्पासाठी जिल्हा परिषदेत गठीत केलेल्या **जिल्हा मूल्यमापन व संनियंत्रण चमूकडे** (DAMT) मूल्यमापनासाठी (Appraisal) सादर केलेल्या प्रस्तावासोबत जोडण्यात याव्यात.<br>ग्राम पंचायतीकडून आलेले प्रस्ताव, मूल्यमापन प्रपत्रातील तांत्रिक सामाजिक, प्रक्रिया, पर्यावरण व आर्थिक निकष/बाबी विचारात घेऊन व **जिल्हा सुविधा चमुने** वेळोवेळी जाहिर केलेल्या JSR (जलस्वराज्य शेडयूल ऑफ रेट) प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| | | तपासून जिल्हा मूल्यमापन व संनियंत्रण चमूने (DAMT) एकाच मूल्यमापनात (One Seating) मंजूर करावेत. या चमूने प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन व आवश्यक वाटल्यास क्षेत्रीय पाहणी करुन, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीशी चर्चा करुन दोन आठवड्यांच्या आत त्यांना मंजूरी द्यावी. |
| ३ | (१५) योजना मंजूर झाल्याचे पत्र ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला प्राप्त झाल्यानंतर, ठरलेल्या टप्प्यानुसार लोकवर्गणीची आवश्यक रक्कम बॅक खात्यात जमा करावी व नंतर जिल्हा परिषदेला कळवावे. मंजूर आराखडे व प्राकलनात नमूद टप्प्यानुसार जिल्हा परिषदेतर्फे वेळोवेळी आवश्यक रक्कम त्या बॅक खात्यात जमा करण्यात यावी. | (१५) जलस्वराज्य कार्यक्रमाखालील गावाने निश्चित केलेल्या सार्वजनिक सुविधाबाबत सर्वसाधारण क्षेत्रात लोकसहभागाची किमान १०% रक्कम तर आदिवासी क्षेत्रात लोकसहभागाची किमान ५% रक्कम श्रमदान, वस्तूरुपाने किंवा अंशतः रोख स्वरुपात जमा करावयाची आहे यापैकी सर्वसाधारण क्षेत्रासाठी किमान ५% व आदिवासी गावांसाठी किमान १% रोख वर्गणी जमा करणे आवश्यक आहे. जिल्हा मूल्यमापन व संनियंत्रण चमूने योजनेच्या प्रस्तावाला मंजूरी देताना अशा प्रकारे जमा करावयाच्या किमान रोख रकमेपैकी जास्तीत जास्त लोकसहभाग (सर्वसाधारण क्षेत्रासाठी किमान ३ % व आदिवासी क्षेत्रासाठी १ %) प्राप्त होईल असे पहावे. |
| ४ | (१६) योजना मंजूर झाल्यावर व कंत्राटदाराची नियुक्ती केल्यानंतर ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, जिल्हा परिषद व कंत्राटदार यांच्यात योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबत त्रिपक्षीय करार करण्यात यावा. | (१६) ग्रामपंचायतीना ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या मार्फत पाणी पुरवठा सुविधांची कामे स्वतः मजूर लावून, तंत्रज्ञाच्या सेवा वापरुन व सामुग्री स्वतः खरेदी करुन किंवा काही तांत्रिकदृष्टया किचकट कामे खुल्या व पारदर्शक पध्दतीने कंत्राटदार लावून व इतर कामे ग्रामपंचायतीला (ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती) स्वतः करुन घेता येतील. हे विविध पर्याय ग्रामसभेपुढे ठेवून त्यातून किफायतशीर खर्चाचा, व्यावहारिक व योग्य पर्याय निवडण्यात यावा. यासाठी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, जिल्हा परिषद व कंत्राटदार अशा त्रिपक्षीय कराराची आवश्यकता नाही. **हा करारनामा ग्रामपंचायतीतर्फे ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती आणि यथास्थिती कंत्राटदार, पुरवठादार किंवा तांत्रिकसेवा पुरवठादार यांच्यातील द्विपक्षीय करार असेल.** |

| | | |
|---|---|---|
| ५ | (१८) ग्रामसभेने ठराव केल्यास, योजनेच्या प्रत्यक्ष तांत्रिक देखभालीसाठी जिल्हा परिषद किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे तांत्रिक अधिका-यांना यासाठी त्यांना नियुक्त करता येतील. मात्र जिल्हा परिषदेंच्या वतीने योजनेच्या कामाची तांत्रिक तपासणी, देखभाल व प्रतिस्वाक्षरी यासाठी जे अभियंते नेमले असतील त्याच अभियंत्यांना गावाच्या वतीने तांत्रिक देखरेखीसाठी नियुक्त करण्यात येवू नये. अशा तांत्रिक देखरेखीचा खर्च योजनेच्या खर्चात समाविष्ट करावा व तो महाराष्ट्र जीवन प्राधिकरण/जिल्हा परिषद यांना गावातर्फे अदा करण्यात यावा. यासाठी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती व जिल्हा परिषद/महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्यात स्वतंत्र करार करण्यात येईल. कालांतराने यासाठी शासन तांत्रिक देखरेख करु शकणा-या सेवाभावी संस्था/तज्ञ यांचे पॅनेल तयार करेल त्यातून तांत्रिक देखरेख करता येईल परंतू, तोपर्यंत वरील पध्दत लागू राहिल. | (१८) ग्रामसभा, पाणी पुरवठा योजनेच्या कामावर तांत्रिक देखरेख (प्रकल्प व्यवस्थापन) ठेवण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अभियंता, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेचे तांत्रिक अधिकारी किंवा खाजगी अनुभवी सल्लागार /अभियंता यांची प्रकल्प व्यवस्थापक (Project Manager) म्हणून करारावर नेमणूक करु शकेल. अशा संपूर्ण तांत्रिक देखरेखीसाठी योजनेच्या प्रत्यक्ष किंमतीच्या ५% पर्यंत कमाल शुल्क देता येईल. हे शुल्क संबंधीत ग्रामपंचायतीने मंजूर प्रकल्पातून द्यावयाचे आहे. हे शुल्क प्रकल्प किंमतीत अंतर्भूत असेल. **जिल्हा परिषद ही स्वत:च ग्रामपंचायतीकडून प्राप्त योजनांचे मूल्यमापन करणारी संस्था असल्याने ग्रामपंचायतीच्यावतीने जिल्हा परिषदेच्या अभियंत्यालाच प्रकल्प व्यवस्थापक नेमून तांत्रिक देखरेखीचे काम सोपविता येणार नाही.** जिल्हा परिषदेचे कार्य गावाच्या कामांवर सनियंत्रण ठेवणे, मार्गदर्शन करणे,अडचणी निवारण करणे, गावाने नेमलेल्या प्रकल्प व्यवस्थापकाने ठेवलेला अहवाल व कार्यपध्दती तपासणे, इत्यादी सहाय्यक स्वरुपाचे राहील. बाहेरील सुविधा उपलब्ध नसल्या तर जिल्हा पकल्प संचालक (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ) यांच्या पूर्व संमतीने जिल्हा परिषदेचे जे अभियंते संनियंत्रण करणार नाही त्यांचेकडून हे काम अतिशय तातडीच्या वेळीच करुन घेता येईल. (DFT मधील अभियंता) ग्रामपंचायतीला तांत्रिक देखरेखीकरिता प्रकल्प व्यवस्थापक/साईट अभियंत्याची नियुक्ती करण्याच्या कामात जिल्हा सुविधा चमू (DFT) मदत करु शकेल. मात्र, कामाची स्वतंत्ररित्या तपासणी व संनियंत्रण वेळोवेळी करण्याचे जिल्हा परिषदेचे (DAMT चे) अधिकार कायम राहतील. |
| ६ | (१९) ग्रामसभेने ठराव करुन हे काम ग्रामपंचायतीअंतर्गत करण्याचे ठरविले तर त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिका-याची पूर्व परवानगी घ्यावी लागेल. | (१९) ग्रामसभेने हे काम कंत्राट न देता ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडून विभागांतर्गत (Departmental) करण्याचे ठरविले तर त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिका-याची परवानगी घेण्याची आवश्यकता राहणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| ७ | २१) कंत्राटदाराची बिले कामाच्या टप्प्यानुसार अदा करण्याचे अधिकार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला असतील. मात्र बिले अदा करण्यापूर्वी जिल्हापरिषदेच्या तांत्रिक अधिका-यांकडून ती तपासून घेवून त्यांची प्रति स्वाक्षरी घेतल्यानंतरच ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती रक्कम धनादेशाद्वारे अदा करेल. बँकेला त्यानुसार जिल्हापरिषदेकडून आगावू सूचना देण्यात याव्यात. | (२१) कंत्राटदारांची बिले कामाच्या टप्प्यानुसार अदा करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला असतील. सदर बिले अदा करण्यापूर्वी जिल्हा परिषदेच्या तांत्रिक अधिका-यांकडून तपासून घेऊन त्याची प्रतिस्वाक्षरी घेण्याची आवश्यकता नाही. मात्र ग्रामस्तरावरील ग्रामसभेने नेमलेल्या **ग्राम सामाजिक लेखा परीक्षण समितीची** सहमती लागेल. मात्र वेळोवेळी आवश्यकतेनुसार स्वतंत्र तपासणी करण्याची जिल्हा परिषदेला मुभा राहील. |
| ८ | (२३) साधन सामुग्री खरेदी करताना राज्य शासनाने, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने अथवा जिल्हा परिषदेने याबाबत दर करार केलेले असल्यास त्यानुसार व त्याच प्रतीची खरेदी करावी. दर करारापेक्षाही कमी रक्कमेत व उच्च प्रतीचा माल उपलब्ध होवू शकतो अशी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची खात्री झाल्यास निविदा सूचना अथवा दरपत्रके मागवून जिल्हापरिषदेच्या संबंधित तांत्रिक तंज्ञाच्या पूर्व सहमतीनुसार व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पूर्व परवानगीने निर्णय घेण्यात यावा. | (२३) योजनेसाठी कोणतीही साधनसामुग्री खरेदी करतांना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-याची तांत्रिक पूर्व सहमती व पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. आवश्यकता असल्यास, मात्र मागणीनुसार ग्राम पंचायतीस तांत्रिक सल्ला, सहकार्य व मार्गदर्शन करावे. यासाठी JSR (Jalswarajya Schedule of Rate) जे DFT तयार करुन किमान दर ६ महिन्यानी जाहीर करेल त्याचा उपयोग करावा.तसेच मालाच्या प्रतीची तपासणी इंजीनियरींग कॉलेज इत्यादी संस्थांकडून ग्रामपंचायत परस्पर करुन घेवू शकेल व अहवाल तपासणीसाठी लेखापरिक्षकाला, DAMT ला वेळोवेळी उपलब्ध करुन देईल. |
| ९ | (२४) कार्यादेश देण्याच्या करारपत्रावर **ग्रामसभेने** मान्य केलेल्या **ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे पदाधिकारी** यांच्या सहया असतील व जिल्हापरिषदेने विहित केलेल्या तांत्रिक अधिका-याची प्रति स्वाक्षरी (Counter Signature) त्यावर राहील. | (२४) कार्यादेश देण्याच्या करारपत्रावर **ग्रामसभेने** मान्य केलेल्या ग्रामपंचायतीच्या **ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे पदाधिकारी** यांच्या सहया असतील (त्यात किमान १ महिला असेल) जिल्हा परिषदेने विहित केलेल्या तांत्रिक अधिका-याची प्रति स्वाक्षरी (Counter Signature) घेण्याची आवश्यकता नाही. |
| १० | २८) पाणी पुरवठा योजनेच्या कामाच्या **पूर्णत्वाचा दाखला** गावातील महिला मंडळांच्या सहमतीनंतरच देण्यात येईल व कंत्राटदाराची अंतिम देयके **ग्रामसभेने मान्यता** | (२८) पाणी पुरवठा योजनेच्या कामाच्या **पूर्णत्वाचा दाखला** गावातील महिला मंडळांच्या अथवा ग्रामपंचायतीच्या **महिला विकास समितीच्या** सहमतीनंतरच देण्यात येईल व कंत्राटदाराचे शेवटचे अंतिम देयक **ग्रामसभेने मान्यता** |

| | | |
|---|---|---|
| | दिल्यानंतर आणि जिल्हापरिषदेच्या संबंधित तांत्रिक अधिका-यांनी प्रति स्वाक्षरी केल्यानंतरच अदा करण्यांत यावीत. | दिल्यानंतर अदा करण्यांत यावीत. सदर देयके अदा करण्यासाठी जिल्हापरिषदेच्या संबंधित तांत्रिक अधिका-यांची प्रति स्वाक्षरी घेण्याची आवश्यकता नाही. |

२. ही दुरुस्ती तात्काळ अंमलात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(सुधीर ठाकरे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रत,
मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा.अध्यक्ष,जिल्हा परिषद (सर्व)
मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई.
विभागीय आयुक्त,सर्व
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई.
संचालक,भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे.
जिल्हाधिकारी, (सर्व )
मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद. (सर्व)
जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (सर्व )
प्रादेशिक मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
तहसीलदार (सर्व)
कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
उप अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
गट विकास अधिकारी,पंचायत समिती (सर्व)
महालेखापाल,महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परीक्षा) (लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल,महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परीक्षा) (लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक,स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई.
मुख्य लेखा परीक्षक,स्थानिक निधी लेखा,नाशिक,पुणे,औरंगाबाद,अमरावती व नागपूर
नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई.
वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
मंत्रालयातील सर्व विभाग
पाणी पुरवठा विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती,कार्यासन क्रमांक पापु.०७

एच-744(2,000-8-03)-3अ.
D:\c.r.166-03.doc